महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-४०२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात दिनांक :- १२ जुलै, २०२४

## -: शुद्धिपत्रक :-

## महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४
## (जाहिरात क्रमांक ४१४/२०२३, दिनांक २९ डिसेंबर, २०२३)

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता दिनांक ०८ मे, २०२४ च्या शुद्धिपत्रकानुसार एकूण ५२४ रिक्त पदांचा समावेश जाहिरातीमध्ये करण्यात आला असून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. तसेच दिनांक ३० मे, २०२४ च्या शुद्धिपत्रकानुसार अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना इतर मागास वर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास विहित मुदतीत त्याबाबतचा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. तसेच उपरोक्त दोन्ही शुद्धिपत्रकान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील व इतर मागास वर्गातील नव्याने पात्र ठरलेल्या (अराखीव करीता वयाधिक) उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्यात आली आहे.

२. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ इतर मागास वर्ग हे विकल्प निवडण्याची मुभा दिलेल्या कालावधीत बऱ्याच उमेदवारांकडे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळविण्यास काही अडचणी आल्या असल्याची निवेदने प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने ज्या उमेदवारांकडे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ इतर मागास वर्ग प्रवर्गाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक वर्गवारीचे प्रमाणपत्राआधारे त्यांचा मूळ अर्जातील दावा कायम ठेवला आहे अशा उमेदवारांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक १२ जुलै, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये ज्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाचे तसेच शासन निर्णय, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२३ च्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र उपलब्ध झालेल्या उमेदवारांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय नाही. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ इतर मागास वर्ग प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तसेच इतर कोणत्याही मागास प्रवर्गास आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचा विकल्प अनुज्ञेय नाही.

३. यास्तव, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ परीक्षेकरीता मूळ जाहिरातीस अनुसरून फक्त अराखीव (खुला) (Open) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा उमेदवारांना त्यांचा अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा (EWS) दावा बदलून त्यांच्याकडील जात प्रमाणपत्राच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

४. **वरील वस्तुस्थिती व शासन अभिप्राय विचारात घेता दिनांक २१ जुलै, २०२४ रोजी घेण्यात येणारी** महाराष्ट्र **राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्यात येत असून सदर परीक्षा रविवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात येईल, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**५.** आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ परीक्षेकरीता मूळ जाहिरातीस अनुसरून अर्जाद्वारे अराखीव (खुला) (Open) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) अर्ज केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) दावा करण्याकरीता विकल्प सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या "Question " या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) विकल्प सादर केलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) चा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) दावा केलेल्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) विकल्प सादर न केल्यास सदर उमेदवारांचा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घंटकातील (EWS) दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच सदर दावा बदलण्याची विनंती भरतीप्रकिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(५) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) (Open) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा (EWS) दावा केलेल्या उमेदवाराने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अथवा इतर मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता **दिनांक १५ जुलै, २०२४ २०२४ रोजी १४.०० वा. ते दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी २३:५९ पर्यंत** विकल्प सादर करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे

**६**. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अथवा इतर मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर विकल्प सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच **दिनांक १४ ऑगस्ट, २०२४** पर्यंतचे असणे आवश्यक आहे.

**७.** प्रस्तुत परीक्षेकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा अथवा इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे(NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**८**. दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध जाहिरात तसेच दिनांक २४ जानेवारी, २०२४, ०८ मे, २०२४ व ३० मे, २०२४ रोजी प्रसिद्ध शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग